# शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

उस्मानपुरा, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी : कार्यालय २३३४७२४, २३२१९१७, प्राचार्य २३५३६४४, प्रशासकीय अधिकारी २३४५९३६

Website : www.gpabad.ac.in e-mail- principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in


जा.क्र. : शातंछसं/वृक्षतोड/२०२५/1180

दिनांक : 26 MAR 2025

**विषय : वृक्ष तोडणे / छाटणे करिता निविदा मागवणे बाबत.**

संदर्भ : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका चे वृक्षतोड परवानगी जा.क्र. मनपा/उद्यान/२०२५/९०२ दि.०३.०३.२०२५

वरील संदर्भीय विषयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी संस्थेतील वृक्ष तोडणेस परवानगी दिलेली आहे. त्यानुसार संस्थेतील झाडे तोडणे /छाटणे करिताची पुढील कार्यवाही करावयाची आहे. याकरिता दि.०२/०४/२०२५ पर्यन्त निवीदा मागवण्यात येत आहे.

अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थेतील खालील प्रमाणे वृक्ष तोडण्याचे काम करावयाचे आहे.

| अ.क्र. | वृक्षांचे नाव | वृक्ष तोडण्याचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | निलगिरी -- ०२ | सदर वृक्ष रस्तावर झुकलेले असल्याने तोडणेस | तोडणेस |
| ०२ | पाम -- ०१ | सदर वृक्ष पूर्णपणे वाळलेलो असल्याने तोडणेस | तोडणेस |
| ०३ | सुबाभुळ -- ०२ | सदर वृक्ष पूर्णपणे वाळलेलो असल्याने तोडणेस | तोडणेस |
| ०४ | कडुलिंब —०१ | सदर वृक्षाचा विस्तार पार्किंगच्या शेडवर झुकलेला असल्याने वृक्षाची एक फांदी छाटणेस | छाटणेस |

## अटी व शर्ती

१. सदर वृक्षतोड करतेवेळी कोणत्याही प्रकारचा अपघात अगर जिवितहानी झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत निवीदाधारक/पुरवठाधारक यांच्यावर राहील.

२. संस्थेतील मालमत्तेचे नुकसान झाल्यास तसेच इलेक्ट्रीक वायर, फोन वायर, केबल इत्यादीचे नुकसान झाल्यास त्यांची नुकसान भरपाई करुन देण्याची जबाबदारी निवीदाधारक/पुरवठाधारक यांच्यावर राहील.

३. सदरील वृक्ष तोडले नंतर वृक्षांचे फांदया, पर्णफांदया व पाने व लाकूडफाटा त्वरित उचलून नेण्यात यावे, तसेच सदरील परिसर स्वच्छ करुन देण्यात यावा.

४. वृक्षतोड कार्यवाही रविवारी तसेच सार्वजनक सुट्टीच्या दिवशी करण्यात येवू नये.

५. वृक्षतोड करीता लागणारे मशीनरी / साहित्य, वृक्षावरती जाण्यासाठीची सीडी तसेच इतर साहित्य संबंधीताना आणवे लागेल.

६. वृक्ष तोडणे/छाटणे करिताची मजूरी/लेबर चार्जेस तसेच वृक्ष तोडल्यानंतर वृक्ष नेण्यासाठीचा लोडीग तसेच वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधीत निवीदाधारक/पुरवठाधारका कडे राहिल.

७. लोडीग / अनलोडीग करते दरम्यान तसेच वाहतुकी दरम्यान कोणतीही अनूचीत घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही.

८. सदरील निवीदा जास्तीत जास्त दर भरणा-या निवीदाधारकास देण्यात येईल.

९. निवीदे चे दरपत्रक लिफाफयात सिलंबद करुन दि.०२/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत दु.५.०० वाजेपर्यत सादर करावेत.

१०. सदर लिफाफयावर **वृक्ष तोडणे / छाटणे करिता चे** दरपत्रक असे ठळक अक्षरात नमूद करावे.

११. निवीदेत नमूद दरा नूसार सरकारी चलन भरल्यानंतर संबंधीतास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात येईल.

१२. सदरील प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार निम्म स्वाक्षरीता करणारे स्वतः कडे राखून ठेवलेला आहे. तसेच कोणतीही सबब/ कारण न देता निविदा स्वीकारण्याचा अथवा निवीदा नाकारण्याचा अथवा सर्व प्रक्रीया स्थगीत करण्याचा अधिकार हा मा.प्राचार्य यांना राखून ठेवण्यात आलेला आहे.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन छत्रपती संभाजीनगर